THANE CITY
Safe Thane Secure Thane

❖ **प्रेसनोट** ❖

शांतीनगर पोलीस ठाणे,भिवंडी
परिमंडळ-२, भिवंडी
ठाणे शहर

दिनांक ३१/०५/२०२५

'' दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या आरोपींना शांतीनगर पोलीसांनी अटक करून ०४ अग्नीशस्त्र, एक बी.एम.डब्ल्यु कारसह १७,३१,२००/-रूपयांचा मुद्देमाल हस्तगत ''

दिनांक ३१/०५/२०२५ रोजी शांतीनगर पोलीस ठाण्याचे तपास पथक रात्रौगस्त करीत असतांना 'शानदार मार्केट या परिसरातील मोकळ्या मैदानाजवळ रोडच्या बाजुला पाच इसम त्यांचे ताब्यात हत्यारे व अग्नीशस्त्र घेवून कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने रात्रीच्या अंधारात एका बी.एम.डब्ल्यु कार नंबर एम.एच.०२,बी.झेड.५६७१ मध्ये लपून बसलेले आहेत.' अशी पोशि/८२४२ प्रशांत बर्वे यांना मिळालेल्या माहितीवरून तपास पथक अधिकारी सुरेश चोपडे व पोलीस अंमलदार यांनी शानदार मार्केट येथील मोकळ्या मैदानाजवळ रोडच्या बाजुला, चाविंद्रारोड, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे येथे उभ्या असलेल्या संशयीत बी.एम. डब्ल्यु कार नंबर एम.एच.०२,बी.झेड.५६७१ मधील आरोपी नामे-१) शोएब शाहीद शेख, वय २३ वर्षे, २) नौशाद मक्सुद आलम खान, वय २२ वर्षे, ३) अफताब अफसर शेख, वय २१ वर्षे, मुळ रा.दरभगा, राज्य-बिहार ४) शहाबुद्दीन अलीमुद्दीन अन्सारी, वय २० वर्षे, सध्या रा.अ.क्रं. १, २ व ४ शानदार मार्केट,चाविंद्रारोड, तालुका-भिवंडी, जिल्हा-ठाणे यांना ताब्यात घेवून त्यांचेकडे कसून तपासणी केली असता त्यांचे कब्जात एक लोखंडी कटावणी, लोखंडी रॉड, दोरखंड, तीन कपड्याचे मास्क, मिरची पुड,एका पिशवीमध्ये सफेद रंगाचे ४ जोड हॅन्डग्लोज, चाकु, सेलो टेप, मोबाईल, दोन देशी बनावटीचे कट्टे, दोन देशी बनावटीचे पिस्टल असे एकुण चार अग्नीसस्त्रे व एक बी.एम.डब्ल्यु कार क्रमांक एम.एच.०२,बी.झेड.५६७१ सह एकुण १७,३५,२००/-रूपये किंमतीच्या मुद्देमालासह वर नमुद चार आरोपीत यांना दरोडा घालण्याचे तयारीत असतांना मिळुन आल्याने त्यांना पकडून त्यांचे विरूध्द शांतीनगर पोलीस स्टेशन,भिवंडी गुन्हा रजिस्टर नंबर । ६५४/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३१०(४), ३१०(५) सह आर्म ॲक्ट ३, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१), १३५ तसेच मोटार वाहन कायदा १९८८ चे कलम ३/१८१ अन्वये दिनांक ३१/०५/२०२५ रोजी गुन्हा दाखल करून चार आरोपीत यांना अटक करण्यात आली आहे. आरोपीत यांना मा. न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने आरोपींची दिनांक ०४/०६/२०२५ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजूर केली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे करीत आहेत.

सदरची कामगिरी अपर पोलीस आयुक्त सो श्री विनायक देशमुख, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर, पोलीस उप आयुक्त शशिकांत बोराटे, सहा.पोलीस आयुक्त सचिन सांगळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड, पोनि (गुन्हे) अतुल अडूरकर, पोनि(प्रशासन) विनोद पाटील यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील सहा.पोलीस निरीक्षक सुरेश चोपडे, सहा.पोलीस निरीक्षक योगेश गायकर, पोहवा/१८६५ रिझवान सैय्यद, पोहवा/६९०४ निलेश महाले, पोहवा/४९६८ लक्ष्मण सहारे, पोशि/८२४२ प्रशांत बर्वे, पोशि/८३१७ रोशन जाधव, पोशि/४७१७ दिपक सानप, पोशि/४०९८ भुषण पाटील व तपास पथकातील अंमलदार यांनी केली आहे.

